# शेतकऱ्यांना नव्या वाटेने जाताना...!

झोत

राजेंद्र पाटील, पुणे, 9822753219

**आडतदारांची आणि व्यापाऱ्यांची मक्तेदारी मोडीत काढायची असेल तर शेतकरी व ग्राहकांना संयम ठेऊन केवळ सरकारवर अवलंबून न राहता विविध मार्ग अवलंबवावे लागणार आहेत. त्यामध्ये विशेषतः तरुणांनी एकत्रित येऊन यातून मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. सर्वांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला तरच बाजार समित्यांची आणि व्यापाऱ्यांची मक्तेदारी मोडीत काढता येईल.**

बाजार समितीच्या जोखडातून बाहेर काढण्यासाठी राज्य सरकारने फळे आणि भाजीपाला बाजार नियमनातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला आणि गेले १५ दिवस आडतदार, व्यापारी यांच्या आडमुठेपणामुळे शेतकरी आणि ग्राहक कशाप्रकारे वेठीस धरला गेला, हे महाराष्ट्रात सर्व ठिकाणी बघायला मिळाले. खरतर अनेक दिवसांपासूनचा प्रलंबित असलेला नियमन मुक्तीचा हा निर्णय राज्य शासनाने घेतला तो योग्यच आहे. परंतु अंमलबजावणी करण्याअगोदर परिणामांचा आणि पर्यायी व्यवस्थेचा विचार करायला हवा होता तो केला गेला नाही, त्यामुळे शेतकरी व ग्राहकांचे हाल झाले. अर्थात आडतदारांची आणि व्यापाऱ्यांची ही मक्तेदारी मोडीत काढायची असेल तर आपल्यालाही संयम ठेऊन केवळ सरकारवर अवलंबून न राहता विविध मार्ग अवलंबवावे लागणार आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांनी विशेषत: तरुणांनी एकत्रित येऊन यातून मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी पारंपरिक यंत्रणेबरोबरच नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सरकार बाजार समित्यांची मक्तेदारी मोडीत काढण्याचा प्रयत्न करत आहे. स्पर्धात्मकता असली तरच शेतीमालाला चांगला भाव मिळू शकतो, हे वास्तव आहे; परंतु सरकारने त्याबाबत कधीच विचार केला नव्हता. राधाकृष्ण विखे कृषिमंत्री असतानाही शेतीमाल कुठेही विकायला परवानगी देण्याचा निर्णय झाला होता; परंतु संघटित व्यापारी आणि हमाल, मापाड्यांच्या दबावामुळे तो निर्णय लांबणीवर पडला. राज्यात भारतीय जनता पक्ष-शिवसेनेचे सरकार आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी सरकारने समिती नेमली होती. डॉ. गिरधर पाटील, रघुनाथदादा पाटील तसेच व्यापारी प्रतिनिधींचाही त्यात समावेश होता. या समितीने सरकारला अहवाल दिला. त्यात शेतीमाल कुठेही विकायला परवानगी देण्यास अनुकूलता दाखवली. या सरकारला शेतकरी संघटनेचाही पाठिंबा असल्याने या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक होतेच. खुल्या व्यापाराच्या पार्श्वभूमीवर आता कोणालाही बंधनात अडकवता येणार नाही, हे साधे तत्त्व आहे.



चांगल्या पावसाने शेतकऱ्यांना आणि सामान्य जनतेलाही सुगीचे चांगले दिवस येतील, अशी अपेक्षा होती. पावसाने वायदे बाजारात शेतीमालाचे भाव कमी होतील, हे चित्र होते. अर्थात व्यापारी, आडते आणि बाजार समित्यांमधील कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या आंदोलनामुळे लोकांच्या जीवनातला दररोजचा भाजीपाला मिळणेही अवघड झाल. शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून मंत्रिमंडळात सहभागी झालेल्या सदाभाऊ खोत आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खा. राजू शेट्टी यांनी भलेही ठराविक ठिकाणी जाऊन शेतीमाल विकला असला, तरी त्यामुळे शेतकऱ्यांचा प्रश्न सुटला नाही.

केंद्र सरकारने फळे आणि भाजीपाला बाजार नियमनातून मुक्त करण्याच्या आदर्श कायद्याला संमती दिल्याचा निर्णय अतिशय स्वागतार्ह आहे; परंतु त्याची अंमलबजावणी करण्याअगोदर परिणामांचा आणि पर्यायी व्यवस्थेचा विचार करायला हवा होता. तोच या सरकारने केलेला नाही. धनदांडगे पुढारी, ठोक व्यापारी आणि आडते यांच्यामध्ये कमालीचा असंतोष निर्माण झाला.

मुंबई तसेच लगतच्या ठाणे, नवी मुंबई आदी महानगरांना भाजीपाला पुरवण्याचे मुख्य केंद्र असलेल्या वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती, पुण्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच राज्यातील अन्य बाजार समित्यांतील व्यापारी, आडते, दलाल, हमाल, मापाड्यांनी हा मुहूर्त साधून संप पुकारला. राज्याच्या अन्य जिल्ह्यांमध्येही या आंदोलनाचे लोण पसरले. त्यामुळे नाशिक तसेच अन्य बाजार समित्यांमधून मुंबई, पुणे आदी शहरांमध्ये होणारी भाजीपाल्याची आवक घटली आणि आधीच गगनाला भिडलेल्या भाजीपाल्याच्या भावाने पुढचा पल्ला गाठला. मुंबईत साधारणपणे ७० ते ८० रुपये दराने भाजीपाला विकला गेला.

शेतकऱ्यांकडून सरासरी १० रुपये किलोने शेतीमाल घेतला, तर तो ग्राहकांच्या दारापर्यंत जाताना ४० रुपये होतो. याला कारण शेतीमाल विक्रीतील दलालांची साखळी. ही साखळी भेदणे आवश्यक आहे. बाजार समित्यांमधील व्यापाऱ्यांचीही १ साखळी तयार असते. ही साखळी दुसऱ्या व्यापाऱ्यांना बाजार समितीत येऊ देत नाही. ती स्पर्धा होऊ देत नाही.

मक्तेदारी मोडीत काढताना अनेक समस्या निर्माण होतात. त्याला पर्यायी व्यवस्था निर्माण करताना निर्णय घेतल्यानंतर कुठल्या अडचणी येतात याचाही मागोवा घ्यावा लागतो. सरकारचा हा निर्णय छोट्या शेतकऱ्यांना फायद्याचा ठरल्याच्या प्रतिक्रियाही अनेक ठिकाणांहून आल्या. मात्र, मोठ्या प्रमाणात आणलेला शेतीमाल शहरात कुठे विकायचा, कसा विकायचा हा प्रश्न अनेक शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला. दिवसभर थांबून त्याला तो नाशवंत माल विकणे शक्य नसल्याने कवडीमोल किमतीत पदरची खोट खाऊन विकावा लागला. त्यामुळे त्याचा अधिकच संताप झाला. अनेक दिवस बाजार समितीचा बंद असल्याने शेतकऱ्यांनी शेतीमाल न आणल्यामुळे आवक घटली आणि त्याचा फटका ग्राहकांना बसला. त्यांना चढ्या भावाने भाजी व फळे खरेदी करावी लागली. खरे तर किरकोळ भाजी विक्रेत्यांनी शेतकऱ्याच्या पाठीशी उभे रहायला हवे होते. पण या संपात राज्यातल्या बहुतांश भाजी मंडईतल्या किरकोळ भाजी विक्रेत्यांनी व्यापाऱ्यांच्याच संपाला पाठिंबा दिल्यामुळे ग्राहकांची गैरसोय झाली. हे चित्र सर्व ठिकाणी बघायला मिळाले.

राज्यात बाजार समित्यांमधील अडते आणि व्यापारी यांनी कृषी माल नियंत्रण मुक्ती कायद्याच्या विरोधात पुकारलेला बंद आणि त्यामुळे शेतकरी आणि ग्राहक यांची झालेली गैरसोय यावर झालेली चर्चा आणि वाद आपण सर्वांनीच पाहिला. शेतकऱ्यांच्या मालाचा भाव ठरवण्यातील बाजार समित्यांमधील आडते आणि व्यापारी यांची भूमिकाच कृषी माल नियंत्रणमुक्त कायद्याने कमी करून टाकली. या निर्णयाने शेतकऱ्याचा मालदेखील इतर वस्तूंप्रमाणे, भाव ठरवण्याच्या बाबतीत बाजाराच्या अखत्यारीत आला. या निर्णयाचे काही घटकांनी स्वागत केले तर या निर्णयाचा विरोध करणाऱ्यांनी दुसरी बाजू दाखवत असा युक्तिवाद केला की, या निर्णयाने बाजाराचे अर्थतंत्र माहीत नसलेल्या शेतकऱ्याची फसवणूकच होण्याची जास्त शक्यता आहे. ही यंत्रणा मोडीत काढली तर मग भाव नियंत्रित करणारी आणि ग्राहकांचे हित जपणारी नवी यंत्रणा काय असेल, असा देखील प्रश्न विचारला गेला.

या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी सरकार पातळीवर निर्णय होतील. शेतकऱ्यांना त्यासाठी थोडा संयम बाळगावा लागेल. परंतु ते होताना शेतकऱ्यांनी व ग्राहकांनी जागृत होऊन विविध पर्यायांचा विचार करून मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. बाजार समित्यांच्या बंदचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्रीचे नियोजन करावे लागेल. हे करत असताना गावातील तरुणांनी गट करून विविध भाजीपाला एकत्रित करून त्यांचे विभाजन करावे व पिकअपसारख्या छोट्या वाहनांमधून विक्रीसाठी शहरातील विविध भागांत आणावा. काही शेतीमाल बाजार समित्यांमध्येही पाठवावा. या वाहनांसोबत गटातील २-२ शेतकऱ्यांनी यावे. शहरातील विविध ठिकाणांच्या गृहनिर्माण संकुले, सोसायट्यांमध्ये आणून विक्री करावी. रस्त्यालगत देखील वाहने उभी करून शेतीमाल विक्री करता येऊ शकते. हा १ मार्ग झाला. त्याबरोबरच शेतकरी व ग्राहक यांच्यातील मध्यस्त म्हणूनच तंत्रज्ञानाचा पर्यायही उपलब्ध झाला आहे. त्याचाही उपयोग करून घेतला पाहिजे.

नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या 'नाम' फाउंडेशनने पाठिंबा दर्शवलेल्या पुण्यातील मायविश्व टेक्नॉलॉजीजने तंत्रज्ञानालाच शेतकऱ्यांचा मध्यस्थ म्हणून पुढे आणण्याचा विडा उचलला आहे. त्यासाठी त्यांनी फार्मर्सओआरजी. इन (farmersorg.in ) या पोर्टलची निर्मिती केली आहे. संपामुळे शेतकरी, ग्राहक आणि व्यापाऱ्यांची झालेली गैरसोय या पोर्टलमुळे कायमची संपायला मदत होणार आहे.

उपलब्धता आणि आवश्यकता या २ तत्वांवर आधारलेले हे पोर्टल शेतकरी, ग्राहक आणि व्यापारी या तिघांसाठी फायद्याचे आहे. शेतकऱ्याने आपल्याकडे असलेला भाजीपाला, फळे, डाळी यांचे प्रमाण आणि दर्जा यांची सखोल माहिती त्याच्या फोन नंबरसह पोर्टलवर टाकायची. त्याचवेळी या मालाची आवश्यकता असणारे ग्राहक आणि व्यापारी आपली गरज त्यांच्या संपर्क क्रमांकासह या पोर्टलवर टाकतील. या पद्धतीने गरज आणि पूर्ततेचा मिलाफ होऊन, प्रत्यक्ष्य भेटीने खरेदी-विक्रीची प्रक्रिया पूर्ण होईल. थोडक्यात, शेतकरी, ग्राहक, किरकोळ आणि घाऊक व्यापाऱ्यांना एकमेकांना भेटवणारे हे पोर्टल आहे. एवढेच नाही तर शेतीमालाची गरज असणाऱ्या मोठ्या संस्था आणि सोसायट्यादेखील आपल्या गरजा या पोर्टलमधून पूर्ण करू शकतील. महत्त्वाचे म्हणजे यातून या व्यवहारातील सर्वच घटकांना फायदा होणार आहे. तंत्रज्ञान आज आपले जीवन व्यापून टाकत असताना शेतकऱ्याचे जीवन आणि ग्राहकांच्यादेखील फळभाज्या खरेदीच्या कल्पना यामुळे बदलणार आहे.

फार्मर्सओआरजी. इन प्लॅटफॉर्म पोर्टल तसेच अ‍ॅन्ड्रॉईड व आयओएस अ‍ॅपच्या रूपात उपलब्ध आहे. हे अ‍ॅप सर्वांना मोफत डाउनलोड करता येणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे पोर्टल ई-कॉमर्स साईट नाही. म्हणजे येथे कोणत्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार होत नाहीत. शेतकरी, ग्राहक प्रत्यक्ष भेटून पुढील व्यवहार करतात. यातून फसवणुकीच्या प्रकारांना आळा बसेल. या पोर्टलचे आणखी १ वैशिष्ट्य म्हणजे हे पोर्टल मराठी व हिंदीसह १० वेगवेगळ्या भाषांमध्ये सादर केलेले असून, विविध राज्यांच्या शेतीमालाच्या विविधतेनुसार यामध्ये भविष्यकाळात बदल करण्यात येणार आहेत.

माहिती-तंत्रज्ञानाच्या क्रांतीत सर्वत्र बदल होत असताना आपण अशा कल्पनांचे स्वागतच करायला हवे. आज शेतकऱ्यांची मुलेही तंत्रज्ञानाचा उपयोग करणारी आहेत. शेतीमाल पारंपरिक पद्धतीने विकण्यासाठी विविध पर्यायांचा अवलंब करण्याबरोबरच अशा प्रकारच्या नवीन तंत्रज्ञानाच वापर केला तरच बाजार समित्यांची आणि व्यापाऱ्यांची मक्तेदारी मोडीत काढता येईल.